आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु ३.०० वाजता

५ मे २०२४ - रविवार

लोकसभा मतदारसंघात आज निवडणूक प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यानं विविध पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर शहरात जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं. राज्यात इंडिया आघाडीचा प्रभाव असून, त्याचा जोर मराठवाड्यात अधिक असल्यानं, मराठवाड्यातल्या आठपैकी आठ जागांवर महाविकास आघाडीचेच उमेदवार निवडून येतील, असं काँग्रेस नेते अमित देशमुख यावेळी म्हणाले.

कोल्हापूर इथं महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. युतीतील मित्रपक्षांचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं कोल्हापुरात दाखल झाले आहेत.

**पालघर मतदारसंघात** भाजपचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांनी आज सकाळी विरारच्या सुप्रसिद्ध जीवदानी देवी मंदिरात दर्शन घेऊन, प्रचाराला सुरुवात केली. या टप्प्यात राज्यातल्या रायगड, रत्नागिरी - सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले, सांगली, सोलापूर, बारामती, उस्मानाबाद, लातूर, माढा, आणि सातारा, या ११ मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

सांगली लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे अधिकृत उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ मिरज इथं विकसित भारत@2047 संवाद मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या संवादामध्ये डॉक्टर, व्यापारी, उद्योजक सहभागी झाले होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन

गडकरी यांनी मार्गदर्शन केलं. माढा मतदारसंघातले उमेदवार रणजित निंबाळकर यांच्या प्रचारासाठी गडकरी यांनी टेंभुर्णे इथं सभा घेतली.

**<><><><><>**

कोल्हापूर आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघामध्ये ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी घरबसल्या मतदानाचा हक्क बजावला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ हजार ५७९ जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांनी घरुन मतदानाचा हक्क बजावला. गेल्या एक मे ते तीन मे दरम्यान ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसह दिव्यांग मतदारांच्या घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया जिल्हा प्रशासनानं पूर्ण केली.

**<><><><><>**

राज्यात ५ व्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल करण्यात आली. १३ लोकसभा जागांसाठी मतदान होत असून काल या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत ३९७ उमेदवारांचे एकूण ५१२ अर्ज आले होते. त्यापैकी ३०१ अर्ज वैध ठरल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे. या टप्प्यात मतदान येत्या २० मे रोजी होणार आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण पुणे आणि शिरुर लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

अन्नपदार्थात शिल्लक राहणाऱ्या कीटकनाशकांच्या अवशेषांसंबंधी भारतात अतिशय कठोर कायदे असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अथॉरिटी ऑफ इंडिया - एफ एस एस ए आय म्हणजेच अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने काही वनस्पती आणि मसाल्यांमधे कीटकनाशकांच्या अवशेषांचं प्रमाण अधिक राहण्याला परवानगी दिली असल्याचं वृत्त समाजमाध्यमांवर फिरत असून त्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारनं हा खुलासा केला आहे. केंद्रीय कृषी मंत्रालय केंद्रीय कीटकनाशक बोर्डामार्फत कीटकनाशकांच्या दर्जाबाबत नियंत्रण करतं, आणि तज्ञ वैज्ञानिकांच्या शिफारशींनुसारच उत्पादनांना परवानगी दिली जाते असं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना हा चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्स यांच्यात धरमशाला इथं  हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. तर दुसरा सामना हा  लखनऊ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लखनौ मधल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

दरम्यान काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं गुजरात टायटन्सवर ४ गडी राखून विजय मिळवला.

**<><><><>**

वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधल्या भारत नगर परिसरातून बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा मुंबई पोलिसांनी छडा लावला आहे.  पोलिसांनी काल रात्री

छापा टाकून दोघांना अटक केली. दोघांकडून १००, २०० आणि ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

<><><><>

बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे झालेल्या एका कार अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला असून २ जण जखमी झाले आहेत. जखमींना छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. एका अज्ञात वाहनाने पाठीमागून टक्कर दिल्याने हा अपघात झाला.

<><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड तालुक्यात किन्हाळा गावाजवळ लग्नाच्या वऱ्हाडाचा टेम्पो उलटून झालेल्या अपघातात १५ वऱ्हाडी जखमी झाले. यातल्या चौघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना नायगाव इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. चालकाचं टेम्पोवरचं नियंत्रण सुटल्यानं ही दुर्घटना घडली.

<><><><>

ख्यातनाम अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक क्षितिज झारापकर यांचं आज सकाळी मुंबईत निधन झालं. ते ५४ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून ते रुग्णालयात उपचार घेत होते.

क्षितिज झारापकर यांनी गोळाबेरीज, ठेंगा, एकुलती एक, आयडियाची कल्पना आदी चित्रपटांतून भूमिका केल्या. तसंच विविध चित्रपट आणि नाटकांचं दिग्दर्शन आणि लेखन केलं.

//<><><><>//